# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०१४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१४ / पौष १, १९३६ ( शके )**

**(१) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री**
**(२) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री**
**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)**
**(४) आदिवासी विकास मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

### ठाणे शहरातील कोपरी येथील रेल्वे वरील पूलाच्या रुंदीकरणाबाबत

**(१) * ४६१८ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) ठाणे शहरातील कोपरी येथील रेल्वे लाईनवरुन असलेला पूल केवळ दोन लेनचा तसेच अरुंद असल्यामुळे घोडबंदर व कल्याण येथून येणा-या वाहनांमुळे त्या ठिकाणी वाहतूकीची कोंडी निर्माण होते, हे खरे आहे काय,
(2) तसेच, सदर पुलाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर पुलाचे रुंदीकरणाचे काम केव्हा करण्यात येणार आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय.
शासनाने कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून काम अर्थसंकल्पात समाविष्ट आहे.
(३) सदर पुलाचा मांडणी नकाशा रेल्वे विभागाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आला होता. त्यात रेल्वे विभागाने काही सुधारणा सुचविल्यानंतर पुन्हा सुधारीत मांडणी नकाशा फेरसादर करण्यात आला आहे. त्यास मंजूरी प्राप्त झाल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार पुलाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

### सारोळे ( ता.भोर,जि. पुणे) येथील नीरा नदीवरील पूलाच्या दुरुस्तीबाबत

**(२) * ४३९६ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) भोर (जि. पुणे) येथील सारोळे भागातील नीरा नदीवर पुणे बेंगलोर महामार्ग क्र. ४ वर बांधण्यात आलेला पूल अतिशय धोकादायक असून या पुलावर वारंवार अपघात होवूनही या पुलाच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जुलै, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू पूलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाताळगंगा परिसर सहकारी खत उत्पादक केंद्र नंदुरबार यांच्या मालकीची जमिन विनामुल्य खरेदी खताद्वारे विक्री केल्याबाबत**

**(३) * ४७०६ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) चिफ प्रमोटर-नियोजित पाताळगंगा परिसर सहकारी खत उत्पादक केंद्र नंदुरबार यांच्या मालकीची नंदुरबार शिवारातील स.नं.३८१/१ क्षेत्र ४.०८ आरजमिन विनामुल्य खरेदी खताद्वारे अध्यक्ष-बालविकास शिक्षण केंद्र, संचालित नवीन मराठी शाळा व माध्यमिक विद्यालय, नंदूरबार या नोंदणीकृत शैक्षणिक संस्थेस विक्री केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म.सह.दुय्यम निबंधक वर्ग-२ नंदुरबार यांनी दस्त गोषवारा भाग-२ नदब दस्त क्रमांक ४९७५/२००५ पावती क्रमांक ५०९८, दि.७ नोव्हेंबर २००५ या ठिकाणी शैक्षणिक संस्थेचे नाव वगळून श्री.हिरालाल मगनलाल चौधरी यांचे नाव दर्शविण्यात आले व तद्नंतर श्री.शिरीष हिरालाल चौधरी यांचे नाव दर्शविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय
(२) दस्तऐवजामध्ये लिहून घेणार यांचे नाव श्री.हिरालाल मगनलाल चौधरी (मा.अध्यक्ष, बाल विकास शिक्षण केंद्र संचलित नवीन मराठी शाळा व माध्यमिक विद्यालय, नंदूरबार) असे नमूद आहे. मात्र दस्तऐवजाची संगणकामध्ये डाटा एन्ट्री करताना संबंधीत ऑपरेटरने दस्तामध्ये संस्थेचे नाव कंसात लिहिलेले असल्याने त्याची डाटा इन्ट्री केलेली नाही. त्यामुळे लिहून घेणार याठिकाणी फक्त श्री.हिरालाल मगनलाल चौधरी असे नाव अभिलेखीत दिसून येते. परंतु तद्नंतर सूची क्र.२ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून संस्थेचे नाव नमूद करण्यात आलेले आहे. सदर दस्तऐवजामध्ये शिरीष हिरालाल चौधरी यांचे नाव दर्शविण्यात आलेले नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम शहरात वळण रस्ता बांधण्याबाबतचा प्रस्ताव**

**(४) * २५८४ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) वाशिम शहराला वळण रस्ता बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या मान्यतेनुसार प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्ता तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) शासनाच्या रस्ते विकास योजना २००१-२१ नुसार शहरातून होणारी अवजड वाहतूक वळविण्याकरीता जिल्हा मुख्यालयांना रिंगरोड करण्याचे उद्दिष्ट आहे.
(२) सदर काम मंजूरी, निकष, निधी व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्ह्यातील तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील (ओ.बी.सी.) विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या देयकांबाबत**

**(५) * ९२६ श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील तंत्रनिकेतन तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयातील सन २०१२-१३, २०१३-१४ या वर्षातील इतर मागासवर्गीय या प्रवर्गातील असंख्य विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती शासनाकडून प्राप्त न झाल्यामुळे विद्यार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयांनी शासनाकडे मागणी करूनही महाविद्यालयांना निधी वितरीत केला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तात्काळ वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**:** (1) व (2) बुलढाणा जिल्ह्यातील तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचे सन 2012-13 व सन 2013-14 मधील अनुक्रमे 5883 व 7985 इतके अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. तसेच, काही अर्ज त्रुटीमुळे महाविद्यालयांच्या स्तरावर प्रलंबित आहेत. मात्र शासनाकडून निधी प्राप्त न झाल्यामुळे इमाव प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित राहिलेली नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) नाही.

-----------------

**चाळीसगांव तालुका (जि.जळगाव) येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत**

**(६) * २६२८ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) चाळीसगांव तालुका (जि.जळगांव) येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाचे व भुसंपादनाचे काम सुरु झाले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम केव्हा पूर्ण होणे अपेक्षित आहे, तसेच त्यास किती कालावधी लागणार आहे,
(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू काम विलंबाने होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उपविभागीय अधिकारी, चाळीसगांव यांच्या कार्यालयामार्फत भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. केंद्र शासनाच्या धोरणानुसार ८० टक्के भूसंपादन झाल्यानंतर प्रत्यक्ष चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्रधिकरण यांचे मार्फत सुरु करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुंडलवाडी - शेळगाव - चन्नापूर व पाटोदा - माष्टी (ता.बिलोली, जि.नांदेड) या उपसा जलसिंचन योजनेच्या कर्जाचा बोजा शेतकऱ्यांवर असल्याबाबत**

**(७) * ३६२९ श्री.सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली तालुक्यातील (जि. नांदेड) कुंडलवाडी - शेळगाव - चन्नापूर व पाटोदा - माष्टी या दोन उपसा जलसिंचन योजनेच्या नावाखाली नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सेवा सहकारी सोसायटीने ज्या शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर कर्जाचा बोजा टाकण्यात आला आहे, तसेच योजना कार्यन्वितच न झाल्यामुळे व शेतकऱ्यांना कसलाच लाभ न झाल्यामुळे अशा शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती शेतकऱ्यांचा बोजा कमी करण्यात आला आहे,
(३) नसल्यास, वरील प्रकरणी शेतकऱ्यांचा बोजा कमी करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे व आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) शेतक-यांचे कर्जाचा बोजा कमी करण्याचा निर्णय शासनाने धेतला हे खरे नाही. तालुका बिलोली व पाटोदा माष्टी या दोन उपसा जलसिंचन योजनेला नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी अतंर्गत सन १९८५ मध्ये शेळगाव, चेनापूर उपसा जलसिंचन योजनेस रु.१०९.३६ लाख व पोटादा-माष्टी उपसा जलसिंचन योजनेस रु. ९६.०२ लाख कर्जाचे वितरण केलेले आहे. त्याचवेळी योजनेत सहभागी झालेल्या शेतक-यांच्या ७/१२ वर बोजाची नोंद घेतलेली आहे. अशा शेतक-यांच्या कर्जाचा बोजा कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला नाही.
(२) शेतक-यांच्या ७/१२ वरील बोजा कमी करण्यात आलेला नाही.

(३) वरील उपसा सिंचन योजनांना नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्ज दिलेले असल्याने अशा कर्जाचा ७/१२ वरील बोजा कमी करण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

-----------------

**राज्यातील मतिमंद मुलाच्या संस्थाना अनुदान देण्याबाबत**

**(८) * २१७२ श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाने २०१० मध्ये ६ ते १४ वयोगटात बालकांना सक्तीचे व मोफत शिक्षण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यात १६० मतिमंद मुलांच्या संस्था २००२ पासून विनाअनुदानित तत्वावर सुरु आहेत पुणे जिल्हयात २८ शाळांमधुन जवळपास ६ हजार मुले शिक्षण घेत आहेत, सदर संस्थांमध्ये अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गत १० ते १२ वर्षापासून विनावेतन काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(3)असल्यास, तत्कालीन मा.मुख्यमंत्री व मा. सामाजिक न्यायमंत्री यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीत विशेष शाळांच्या अनुदानाचा विषय मार्गी लावू असे आश्वासन दिले , हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, मतिमंद मुलांच्या विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या संस्थाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(5)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**:** (१) होय

(२) होय. अशंत: खरे आहे.

राज्यात मतिमंदाच्या विनाअनुदानित तत्वावरील ९६ शाळा व १३ कार्यशाळा असून त्यामध्ये अनुक्रमे ४१२६ व ५२३ असे एकूण ४६४९ विद्यार्थी प्रवेशित आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यातील १० शाळा आहेत. त्यामधील मान्य विद्यार्थी संख्या ३९४ एवढी आहे. तथापि, शासनाकडून अनुदान प्राप्त होईपर्यंत विनाअनुदानित शिक्षण संस्थेकडून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन देणे अपेक्षित आहे.

(३) नाही. हे खरे नाही.

(४) खाजगी संस्थामार्फत राज्यात चालविण्यात येणाऱ्या विविध अपंगांच्या विनाअनदान तत्वावरील शाळांना अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मनोर (ता. जि.पालघर) येथील विश्रामगृहाची झालेली दुरावस्था**

**(९) * ३६०८ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मनोर (ता. जि.पालघर) येथे कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या विश्रामगृहाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून या विश्रामगृहाची संरक्षण भिंतही पडली असून आतील कक्षही मोडकळीस आलेले आहेत व सर्वत्र गवत व रानटी झाडे उगवलेली आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू विश्रामगृहाची मागील 10 वर्षापासून दुरुस्तीच झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू विश्रामगृहाचे पुर्नबांधणी वा दुरुस्ती लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
(२) अशंत: खरे आहे.
(३) मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांना चौकशी करण्यास आदेशित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील महादेव कोळी समाजाला शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(१०) * १६४६ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यातील महादेव कोळी समाजाच्या एस.टी.प्रवर्गामध्ये समावेश होत असूनही त्यांना अनेक वर्षापासून जातीचा दाखला देण्यात येत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्यामुळे महादेव कोळी समाजाच्या गरजू उमेदवारांना जातीचा दाखला मिळत नसल्याने सर्व सोयी सवलतीपासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रश्नी शासन धोरणात्मक निर्णय घेऊन महादेव कोळी समाजाला न्याय देण्यासाठी कार्यवाही करणार आहे काय,
(4) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.
(२),(३) व (४) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**सावली (जि.चंद्रपूर) शहरातील रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(११) * ३०१५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) सावली तालुक्यामधून (जि.चंद्रपूर) गेलेल्या चंद्रपूर-गडचिरोली राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात रहदारी वाढल्यामुळे अनेक वेळा अपघात होवून जिवितहानी झालेली असून कायदा आाणि सुव्यवस्थेवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे सावली शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती नाका ते ग्रामीण रुग्णालयापर्यंत असलेल्या रस्त्याचे सिमेंटीकरणासह चौपदरीकरण करण्याची मागणी लोकप्रतिनिधीसह नागरीकांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावली शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती नाका ते ग्रामीण रुग्णालयापर्यंत असलेल्या रस्त्याचे सिमेंटीकरणासह चौपदरीकरणाचे बांधकामाबाबत शासनाकडून किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू रस्त्याचे सिमेंटीकरणासह चौपदरीकरणाचे बांधकाम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
(२) व (३)
उपरोक्त रस्ता हा नव्याने राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित झाला असून दर्जोन्नत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील गारगाई नदीवरील पूलाच्या पुर्नबांधणीबाबत**

**(१२) * २६५ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील गारगाई नदीवरील पूल दि.२३ फेब्रुवारी, २०१४ वा त्यासुमारास कोसळला असल्यामुळे या भागातील १२ गावांचा संपर्क तुटला तरी अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही व्यवस्था न केल्याने या भागातील ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन खडतर प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार उक्त प्रकरणी गारगाई पूलाची पुर्नबांधणी करण्याबाबत दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे. दिनांक २३.०२.२०१४ रोजी वाडा तालुक्यातील विक्रमगड मलवाडा गारगांव मांडवा (प्रजिमा ३९ ) रस्त्यावरील साखळी क्र.२२/४०० मधील गारगाई नदीवरील पुलाचा गारगांव गावांकडून क्र.३ चा पीअर अचानक खचला गेला. तथापि , पिक फाटा मार्गे वाडा मलावाडा (रा.मा.३४ अ) या मार्गाने वाहतूक सुरु आहे. तसेच तुटलेल्या पुलाच्या वरील बाजूने तात्पुरत्या वळण रस्त्याची व्यवस्था केली असल्याने वाहतूक सुरु आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन पुलाचे काम नाबार्ड-२० अतंर्गत प्रस्तावित असून मंजूरी, निकष व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

**राज्यातील भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन करणेबाबत**

**(१३) * ४७६१ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यातील भूविकास बॅक ही अवसायनात काढण्याचा आदेश राज्य सरकारने दिनांक १४ फेब्रवारी, २०१३ रोजी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन १९३५ मध्ये स्थापन झालेली ही बँक राज्यात शेतकऱ्यांची बँक म्हणून राज्यात ह्या बँकेची ओळख असून शेतकऱ्यांना या बँकतर्फे कर्ज दिले जात होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बँकेच्या बऱ्याच शाखा स्वत:च्या जागेवर असल्याने बँकेचे पुन्नरुजीवन केल्यास त्याचा भार सरकारवर जास्त पडणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने सदर बँकेचे पुनरुज्जीवन करुन सदर बँक चालविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, याबाबत भू-विकास बँक कर्मचारी संघटनांनी अवसायानाच्या विरोधात मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. याचिका क्र. २८९८/२०१३ व इतर सहा याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने अंतिम आदेश काढून नयेत असे दिनांक ३० एप्रिल, २०१३ रोजी आदेश दिलेले आहेत. सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.
(२) होय, तथापि, भू-विकास बँकाचे गेल्या १७ वर्षापासून कर्ज वाटप बंद आहे.
(३) अंशत: खरे आहे, बँकेकडे स्वमालकीच्या इमारती आहेत. तथापि, भू-विकास बँकाचे गेल्या १७ वर्षापासून कर्ज वाटप बंद आहे. बँकेची थकबाकी वसूली अत्यल्प स्वरुपाची आहे. भू-विकास बँकेकडून शासनास सुमारे १७९१ कोटी इतके येणे आहे. बँकेची पुरेशी पतक्षमता नाही व नक्त मूल्य उणे आहे. त्यामुळे बँकेचे पुनरुज्जीवन करणे शक्य वाटत नाही.
(४) भू-विकास बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली दि.८.५.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने दि.२७.११.२०१४ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत, भू-विकास बँकांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर बैठकीत भू-विकास बँकाबाबत मा. मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात आलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी मा.मंत्री (वित्त, नियोजन व वने ) यांच्या अध्येक्षखाली मा.मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला असून मा.मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर महापालिका`क्षत्रात**
**आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याबाबत**

**(१४) * ३१८३ श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर महापालिका`क्षत्रात आदिवासी विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृह इमारत बांधणीसाठी सन २०१४ मध्ये वा त्यासुमारास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रशासकीय मान्यतेनुसार शासनाने आवश्यक असणारा निधी महानगरपालिकेकडे वर्ग केला आहे काय,
(३) अद्याप निधी महापालिकेकडे वर्ग केला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा :** (1) हे खरे आहे.

(2) व (3) सदरचे काम अर्थसंकल्पीय भाग-3 परिशिष्ट ड मध्ये समाविष्ट झाल्यानंतर तरतूदीच्या उपलब्धतेनुसार निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**सातारा जिल्ह्यातील शिरवळ, लोणंद, फलटण व बारामती रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१५) * ४७३७ श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) सातारा जिल्ह्यातील शिरवळ, लोणंद, फलटण व बारामती या 78 किलोमीटर रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम मार्च, 2013 मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे काम तातडीने व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) भुसंपादनाअभावी काम अपुर्ण आहे. भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करुन रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात पाच कोटी रुपयांचा देयकांचा झालेला गैरव्यवहार**

**(१६) * २३७२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात पाच कोटी रुपयांचा बिल घोटाळा करण्यात आल्याचा प्रकार श्री. सुखदेवे, उपअभियंता, मुंबई दक्षिण उपविभाग, श्री.हेमंत सावंत, उपअभियंता, मुंबई पश्चिम उपविभाग यांनी श्री.सी.बी.पाटील, कार्यकारी अभियंता यांच्या संगनमताने केल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने या प्रकरणातील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) याबाबत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी अहवाल अप्राप्त आहे.

(२) मुख्य अभियंता, मुंबई यांनी सदर तक्रारीबाबत चौकशी करण्यासाठी अधीक्षक अभियंता, मुंबई यांना आदेशित केलेले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर याप्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या शासकीय वसाहतीच्या दुरुस्तीबाबत**

**(१७) * ४१७० कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील पोलिस कर्मचाऱ्यांच्या शासकीय वसाहतीमध्ये घरांच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे वसाहतीमध्ये घाणीचे साम्राज्य व पोलीस कुटूंबियांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीमधील घरांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दुरुस्तीअभावी घाण पसरलेली नाही.
(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे इमारतीची नियतकालिक पाहणी केली जाते. तसेच दुरूस्तीची कामे प्राधान्यक्रमाने निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेतली जातात.

-----------------

**राज्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या समित्या रद्द करण्याबाबत**

**(१८) * ४७३१ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या तालुका स्तरीय समित्या रद्द करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २० नोव्हेंबर २०१४,रोजी वा त्या सुमारास घेतला आहे काय,
(२) असल्यास, नविन समित्या केव्हा स्थापन करण्यात येणार आहेत ,
(३) असल्यास, नविन समित्या स्थापन होईपर्यंत या निराधार व ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन देण्याबाबत कोणती पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे ?

: (१) होय, संजय गांधी योजना समितीवरील सर्व अध्यक्ष व अशासकीय सदस्यांच्या नेमणूका शासन परिपत्रक दि. २७/११/२०१४ नुसार रद्द करण्यात आलेल्या आहेत.
(२) मा.पालकमंत्री यांच्याकडून शिफारशी प्राप्त झाल्यानंतर अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांच्या नियुक्त्या करण्यात येतील.
(३) नविन समित्या स्थापन होईपर्यंतच्या कालावधीत शासन निर्णय दि.२८ सप्टेंबर, २०१० अन्वये गठीत करण्यात आलेल्या उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समित्या कार्यरत राहणार असून त्यांच्यामार्फत लाभार्थ्यांच्या अर्जावर निर्णय घेण्यात येईल.

-----------------

**राजापूर तालूक्यातील (जि.रत्नागिरी) अणुस्कुरा घाटामधील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(१९) * ४६३४ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालूक्यातील (जि.रत्नागिरी) अणुस्कुरा घाटामध्ये गतवर्षी ६० ते ७० लाख रुपयांचा निधी खर्च करुन डांबरीकरण करण्यात येऊनही सदर रस्ता पूर्णपणे नादूरुस्त होऊन रस्त्यात मोठमोठे खड्डे पडले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या डांबरीकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने याबाबत अधिक्षक अभियंत्याकडून चौकशी करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीतांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत  व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) गतवषी ६० ते ७० लाखाचा निधी खर्च करुन डांबरीकरण करण्यात आले हे खरे नाही. तथापि, घाट रस्त्यांच्या ८.६० किमी लांबीपैकी काही लांबीमध्ये तुरळक प्रमाणात खड्डे पडले असून खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालेगाव तालुक्यातील (जि.वाशिम) वाघी गावाजवळील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(२०) * ४२७६ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव तालुक्यातील (जि.वाशिम) अडोळ प्रकल्पाच्या बुडीत `क्षत्रामधील वाघी गावाजवळ उंच पुलाचे बांधकाम जलसंपदा विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेव काम म्हणून देण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामावर निधी उपलब्ध असूनही काम सुरू झालेले नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर पुलाचे बांधकाम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (1) नाही.
तथापि पुलाच्या सर्वेक्षणासाठी जलसंपदा विभागाने निधी उपलब्ध करुन दिला होता. `क्षत्रिय कार्यालयाने सदर पूल अवर्गीकृत रस्त्यावर असल्याने पूलाचे काम ठेव तत्वावर करणे शक्य नसल्याचे जलसंपदा विभागास कळविले आहे.
(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महागांव तालुक्यातील जि.यवतमाळ संजय गांधी निराधार व वृध्द पेन्शन योजनेतील लाभार्थ्यांना २०११-१२ पासून अचानक पेन्शन बंद झाल्याबाबत**

**(२१) * ४२१४ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) सन २०१०-११ पासून संजय गांधी निराधार योजनेतील तीन हजार प्रकरणे तसेच अन्नपूर्णा योजनेतील चार हजार प्रकरणे अचानक कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी संगनमताने सदर लाभार्थ्यांचे वेतन बंद केल्याने दिनांक 15 जानेवारी, 2014 पासून महागांव तहसील समोर पगार मिळावा यासाठी आमरण उपोषण केले होते, हे खरे आहे काय,
(2) तसेच सन 2011 पासून आजतागायत या लाभार्थ्यांपैकी 35 पात्र लाभार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(3) सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होवून 11 अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ठपका ठेवण्यात येवून दिनांक 3 ऑक्टोबर, 2012 चे सुमारास जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी सदर 11 कर्मचाऱ्यांना नोटीस बजावून दोषारोप ठेवल्यानंतरही अद्याप पर्यन्त कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(4) महागांव तालुका (जिल्हा यवतमाळ) येथील दोषी 11 कर्मचाऱ्यांवर तात्काळ शासन कायदेशरी कार्यवाही करणार आहे काय,
(5) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**:** (१) हे खरे नाही. तथापी महागाव तालुक्यातील श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद केल्यामुळे तहसिल कार्यालयासमोर ठिय्या आदोंलन करण्यात आले होते. या ठिय्या आदोंलनाचा अन्नापूर्णा योजनेशी संबंध नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) सदर प्रकरधी ३ तहसिलदार, २ अव्वल कारकुन व ४ कनष्ठि लिपीक यांचे विरुध्द दोषारोपपत्र विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आले आहे. उर्वरित २ तहसिलदारांच्या स्वाक्षरीने अनुदान वाटप झालेले नसल्याने त्यांना वगळण्यात आले आहे. हे पहाता आवश्यक ती कारवाई सुरु आहे.

-----------------

## आळंदी ते पंढरपूर या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाचा विकास व विस्तारीकरणाबाबत

**(२२) * ४२६८ श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) आळंदी ते पंढरपूर या संत ज्ञानेश्वर महाराजाच्या पालखी महामार्गाचे विस्तारीकरण व रुंदीकरण रखडले आहे, हे खरे आह काय,
(2) तसेच पालखी महामार्गावर सार्वजनिक सुविधा नसल्यामुळे या सुविधा नागरीकांना उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(3) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू पालखी महामार्गाचे योग्य विकास व विस्तारीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गाच्या एकूण २२९.९६ कि.मी. लांबीपैकी एकूण ५२.४० कि.मी. लांबीमध्ये चौपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. ४६.२६ कि.मी. लांबीत चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणांतर्गत प्रगतीत आहे. उर्वरित लांबीचे चौपदरीकरणाचे काम मंजूरी, निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार घेण्याचे नियोजन आहे.

तसेच पालखी मार्गालगत ५.५० मी. रुंदीची स्वतंत्र मार्गीका बांधणे, प्रत्येक ५० कि.मी. अतंरावर विश्रांती स्थळे बांधणे ही कामे मंजूरी, निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ओबीसी, एससी, व्हीजेएनटी आणि एसबीसी**
**प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळत नसल्याबाबत**

**(२३) * ४२०५ डॉ.बालाजी किणीकर (अबरनाथ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) ओबीसी, एससी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्याच्या सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सुमारे ७ लाख ७६ हजार विद्यार्थ्यांना मिळाली नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) चौकशी अनुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती उशीरा देण्याची कारणे काय आहेत तसेच शिष्यवृत्ती तातडीने अदा करण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**:** (1) अशंत: खरे आहे. सन 2013-14 अखेर प्रलंबित असलेल्या एकूण 7 लाख 38 हजार अर्जांपैकी सन 2014-15 मध्ये 5 लाख 43 हजार अर्ज निकाली काढले असून सध्या 1 लाख 95 हजार अर्ज प्रलंबित आहेत.
(2) व (3) प्रलंबित अर्ज प्राधान्याने निकाली काढण्याच्या सूचना दि. 01 ऑगस्ट, 2014 रोजी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार उपरोक्तप्रमाणे 5 लाख 43 हजार अर्ज निकाली काढले असून उर्वरित अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत**
**झालेल्या बोगस कामांची चौकशी करणेबाबत**

**(२४) * ३५७० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुरबाड (जि.ठाणे) सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत झालेल्या बोगस कामांची चौकशी करुन संबंधितांवर कार्यवाही करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ जुलै, २०१३ रोजी वा त्या सुमारास तत्कालीन मुख्यमंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) शासनाने दिनांक २६/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये प्रश्नांकित बाबीची चौकशी दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत करण्याचे आदेश दिले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरातील वरळी येथील एन.एस.सी.आय. एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडीट सोसा.लि. मुंबई या पतसंस्थेतील अपहाराबाबत**

**(२५) * २३५३ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रकाश (बाळा) सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वरळी येथील एन.एस.सी.आय. एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडीट सोसा.लि. मुंबई या पतसंस्थेत रु. ६५ लाख रक्कमेचा अपहार झाल्याचे लेखापरिक्षण अहवालावरुन दिनांक १४ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,
(३) याप्रकरणाची अद्यापही चौकशी पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मुंबई शहरातील वरळी येथील एन.एस.सी.आय. एम्पॉईज को-ऑप. क्रेडीट सोसा. लि. मुंबई या पतसंस्थेत रु.६५ लाख रकमेचा अपहार झाल्याचे लेखापरिक्षण अहवालावरुन निदर्शनास आले आहे.
(२) व (३) संस्थेचे सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ या कालावधीचे शासकीय लेखापरिक्षका मार्फत फेर लेखापरिक्षण करण्यात आले असून फेर लेखापरिक्षणामध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच उपनिबंधक जी/एस विभाग, मुंबई यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार त्यांनी सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची चौकशीसाठी नेमणूक केली आहे. विशेष लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने संबंधित लेखापरिक्षकाने ताडदेव पोलीस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. तसेच गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८८ नुसार चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**मुंबई-गोवा माहामार्गावरील देवरुख विश्रामगृहाजवळ असलेल्या दगडी भिंतीमुळे होत असलेले अपघात**

**(२६) * ४३४९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गावरील देवरुख विश्रामगृहाजवळ असलेल्या दगडी भिंतीमुळे अनेक अपघात होत असूनही याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे

तसेच उक्त भिंत तातडीने हटविण्याबाबतची मागणी स्थानिकांमधून होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली  वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे,
सदर भिंत हटविण्याबाबत मागणी होत आहे, हे खरे आहे.
(२) होय.
चौकशीत दगडी भिंतीवर गाडी आदळून अपघात झाल्याचे आढळून आलेले नाही तथापि चौपदरीकरणाचे काम करताना सदरची दगडी भिंत काढून टाकण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेंडु (खु) (ता.पालम, जि.परभणी) येथील आश्रमशाळा स्थलातंरित केली असल्याबाबत**

**(२७) * ४६६१ श्री.बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) पेंडु (खु) (ता.पालम, जि.परभणी) येथील आचार्य विनोबा भावे प्राथमिक आश्रमशाळा बेकायदेशीरपणे मौ.बनवस येथे हलविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमानुसार आश्रमशाळा ज्या गावासाठी मान्य करण्यात आली आहे तिथून हलविण्याची परवानगी नसतानाही या स्थानांतरणाकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ही आश्रमशाळा स्थानांतरीत केल्यामुळे पेंडु (खु) व पेंडु (बु) या गावांतील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असल्याने ही आश्रमशाळा तातडीने पुन्हा पेंडु (खु) येथे स्थानांतरीत करण्यात यावी  अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ वा त्यासुमारास केली हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आश्रमशाळेचे बेकायदा स्थानांतरण करणारे संस्थाचालक तसेच दुर्लक्ष करणारे अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत  आहे,
(५) सदर आश्रमशाळा तातडीने पेंडु (खु) या मुळस्थानी सुरु करण्यासंदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**:** (१) अशंत: खरे आहे, तथापि मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थलांतर आदेश (दि.१२ जून २००३ चा ) रद्द केला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सद्य:स्थितीमध्ये आश्रमशाळा ही मौजे पेंडू (खू) या ठिकाणी कार्यरत आहे. दिनांक २० नोव्हेंबर २०१४ चे निवेदनाची प्रत या कार्यालयास प्राप्त नाही.
(४) स्थलांतर न झाल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(५) सद्य:स्थितीमध्ये आश्रमशाळा ही मौजे. पेंडू या मुळच्याच ठिकाणी चालू आहे.

-----------------

**कोल्हापूर मध्ये आय.आर.बी कंपनीने कंत्राटी**
**बी.ओ.टी तत्वावर बांधलेल्या रस्त्याबाबत**

**(२८) * ३७८२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) महाराष्ट्र शासनाच्या वतीने कोल्हापूर मध्ये आय.आर.बी कंपनीने कंत्राटी बी.ओ.टी तत्वावर बांधलेल्या रस्त्याबाबत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रचंड असंतोष असून तो रद्द करण्याबाबत शासन काही निर्णय घेणार आहे का,
(2) टोल रद्द करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने पूर्ण रस्त्याच्या कामाचे मूल्यमापन केले होते पण सदरचे मुल्यांकन पूर्ण झाले का ?
(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांची कर्ज वसुली थांबविण्याबाबत**

**(२९) * ४२९८ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दुष्काळ व नापीकाने होरपळत असलेल्या शेतकऱ्यांकडे बँक कर्ज वसूलीचा तगादा करीत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बँकेकडून होत असलेली कर्ज वसूली तातडीने थांबवून शेतकऱ्यांना सरसकट पीक विम्याचे पैसे देण्याबाबत शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे,
(३) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) शासनाने दि. २५.११.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील २३ जिल्ह्यातील १९,०५९ गावांमध्ये ५० पैशापेक्षा कमी हंगामी पैसेवारी असल्याच्या कारणास्तव शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगीती दिली आहे.
तसेच या गावातील २०.५० लाख शेतक-यांनी खरीप २०१४ मध्ये घेतलेले सुमारे ८,००० कोटी पीक कर्जाचे रुपांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कृषी उत्पन्न बाजार समिती, जिंतूर मधील आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(३०) * ४४४२ श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कृषी उत्पन्न बाजार समिती जिंतूर मध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत चौकशी समितीने दिनाक १६ नोव्हेंबर, २०१३ रोजी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, चौकशी अहवालानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(3) तसेच या आर्थिक गैरव्यवहाराबाबत शासनाची निश्चीत भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) सदर चौकशी अहवालात बाजार समितीच्या लेखापरिक्षण अहवालातील शेरे, गाळे/भूखंड वाटप, पणन मंडळाचे कर्ज, कर्मचारी व आजी/माजी संचालकांना दिलेले अग्रिम, बाजार फी व देखरेख शुल्क, निवडणूक अग्रीम, कर्मचारी वेतन, इ. मुद्द आहेत. त्यापैकी पणन मंडळाच्या कर्जाबाबतच्या मुद्दयावर कार्यवाही पूर्ण झाली आहे. उर्वरित मुद्दयांवर कार्यवाही सुरु आहे.
(३) चौकशी अहवालातील बाजार समितीच्या लेखापरिक्षण अहवालातील शेरे, गाळे/भूखंड वाटप, अग्रिम रक्कम, बाजार फी व देखरेख खर्च, कर्मचाऱ्याचे वेतन, या बाबीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला आहे किंवा कसे, याबाबत स्वतंत्र चौकशी करण्यासाठी विशेष लेखापरिक्षक, वर्ग-२, सहकारी संस्था (फिरते पथक) यांच्याकडे दि.२/१२/२०१४ रोजी चौकशीचे काम देण्यात आलेले आहे. सदर चौकशी अहवाल प्रलंबित आहे.

-----------------

**मुंबईतील दहिसर चेकनाका येथील नागरिकांना टोल भरावा लागत असल्याबाबत.**

**(३१) * ३६५४ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दहिसर चेकनाका येथील रहिवाशी असणा-या तरे कंपाऊंडमधील नागरिकांना मुंबईत तसेच जवळपास इतरत्र येण्या व जाण्याकरिता द्रुतमहामार्गाच्या उपयोग करावा लागतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांना वारंवार टोलनाका ओलांडून जावे लागत असल्याने ३५ रुपये जाण्याकरिता व ३५ रुपये येण्याकरिता टोल द्यावा लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २-३ कि.मी. अतंरावर जाण्याकरिताही टोल देऊन जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून त्यांना नाहक भुर्दंड भरावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू टोलनाका दहिसर येथून हलवून मीरारोड हद्दीमध्ये दिल्यास त्यांना टोल भरावे लागणार नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू मागणीनुसार या टोलनाका हलविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) होय, वारंवार वापर करण्यासाठी सवलतीचे मासिक पास शासन अधिसूचनेनूसार सर्वांना उपलब्ध आहेत शिवाय दुचाकी, ऑटोरिक्षा इत्यादीवर पथकर नाही.
(३) नाही.
(४) सदर पथकर स्थानकाचे ठिकाण शासनाने विचारपूर्वक निश्चित केले असून त्यात बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वणी-वरोरा या राज्यमार्गाची झालेली दुरावस्था**

**(३२) * ४६७६ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) वणी-वरोरा हा राज्य मार्ग असून अनेक वर्षापासून खराब आहे, तसेच सदरहू मार्गावर मोठया प्रमाणावर कोळसा वाहतूक, जड वाहतूक सुरु असूनही सदरहू राज्यमार्गाच्या दुरुस्तीबाबत उपाययोजना अजूनपर्यंत करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर राज्यमार्ग यवतमाळ व चंद्रपूर या दोन जिल्ह्यांना जोडणारा असून सदर राज्यमार्गाची दुरुस्ती व उपाययोजना कधीपर्यंत होणार आहे,
(3) तसेच या मार्गावर रेल्वे फाटक असून ते दिवसातून दर १-२ तासाला बंद होत असल्याने तेथील वाहतुक व लोकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, हेही खरे आहे काय,
(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर राज्यमार्गाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशंत: खरे आहे.
सदरहू मार्ग यवतमाळ व चंद्रपूर या जिल्ह्यांना जोडणारा असून या भागात कोळसा व चुनखडीच्या खाणी असल्याने या मार्गावर मोठ्या प्रमाणावर जड वाहनांची वाहतूक आहे. या रस्त्याच्या क्षतीग्रस्त भागाची दुरुस्ती करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) होय.
(४) रस्त्याच्या उर्वरित क्षतीग्रस्त भागातील काही लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे तसेच काही लांबीतील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असून रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत आहे.
प्रश्न भाग ३ मधील रेल्वे उड्डाणपूलाचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जालना-अबंड-वडीगोद्री या रस्त्यांच्या चौपदरीकरणाबाबत**

**(३३) * ३१२८ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1)जालना-अबंड-वडीगोद्री रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम मंजूर झाले असून सदरील कामाच्या निविदा प्रक्रियाही झाली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरील काम त्वरीत होण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशंत: खरे आहे, निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अनुदानित आदिवासी आश्रम शाळा बोथली (गोंड) (ता.उमरेड, जि.नागपूर) या शाळेतील शिक्षकांच्या समस्या निकाली न काढल्याबाबत**

**(३४) * ३८६८ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) बोथली (गोंड) (ता.उमरेड, जि.नागपूर)येथील अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षकांच्या/कर्मचाऱ्यांच्या समस्या मागील १ वर्षापेक्षा जास्त काळापासून प्रलंबित असून त्या निकाली काढण्यासंबंधित नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधीनी अप्पर आयुक्त नागपूर विभाग यांना दिनांक ३० मार्च, २०१३, २० फेब्रुवारी, २०१४, दिनाक २४ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक १६ एप्रिल, २०१४ ला अनेक पत्र पाठवून समस्या निकाली काढण्याची विनंती केली ,हे खरे आहे काय,

(२) तसेच या प्रकरणी शिक्षक व कर्मचा-यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक ५ मे, २०१४ पासून बेमुदत उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने काय चौकशी केली आहे व वारंवार विनंती पत्र देऊन शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या समस्या निकाली न काढण्याचे कारण काय आहे,

(४) तसेच जनप्रतिनिधीनी दिलेल्या पत्राची दखल न घेण्याची कारणे कोणती तसेच संबंधित दोषी व्यक्तीविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (1) होय, हे खरे आहे.

(2) होय, हे ही खरे आहे.

(3) सद्भावना बहुउद्देशीय शिक्षण संस्था, बोथली (गोंड) द्वारे संचालित अनुदानित आश्रमशाळेतत श्री.खोके यांची शिक्षण सेवक म्हणून संस्थेने नियुक्ती केलेली आहे. तथापि, या संस्थेने श्री.खोके यांच्या पदमान्यतेचा प्रस्ताव प्रकल्प कार्यालयाकडे सादर केलेला नाही.

तसेच सदर आश्रम शाळेतील कर्मचारी श्री.योगेश मांडवकर (प्राथमिक शिक्षक सेवक) व श्री.मनोहर हनवटे (अप्रशिक्षीत प्राथमिक शिक्षक सेवक) या कर्मचाऱ्यांच्या पदमान्यतेचा प्रस्ताव अपर आयुक्त, नागपुर यांनी दिनांक5.03.2011 च्या आदेशान्वये अमान्य केला असून अपर आयुक्तांच्या निर्णयाविरुध्द सदर संस्थेने आश्रमशाळा संहिता नियम 2.35 नुसार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडे दिनांक 5.01.2012 रोजी अपील दाखल केले होते. सदर अपीलावर दिनांक 25.5.2012, 18.06.2012, 27.08.2012, 25.2.2013 व 8.04.2013 रोजी सुनावण्या ठेवल्या होत्या. तथापि, अध्यक्ष, सद्भावना बहुउद्देशीय शिक्षण संस्था यांनी त्यांच्या दिनांक 8.04.2013 च्या पत्रान्वये दिनांक 5.01.2012 रोजी दाखल केलेले अपील मागे घेतले आहे.

वरील कारणास्तव सदर तीनही कर्मचाऱ्यांना यानुसार पदमान्यता देण्यात आलेली नसल्याने कर्मचाऱ्यांचे समायोजन अन्य आश्रम शाळेत करण्यात आलेले नाही.

(4) उपरोक्त वस्तुस्थिती मा.लोकप्रतिनिधीना दिनांक 6.05.2014 च्या पत्रान्वये अपर आयुक्त, नागपूर यांनी कळविली आहे.

-----------------

**आरग (ता.मिरज, जि.सांगली) येथे विविध कामांसाठी सामाजिक न्याय विभागाकडून निधी मिळणेबाबत**

**(३५) * ४४५३ श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील मौजे  आरग येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आबेडंकर यांच्या अस्ती जतन केलेल्या आहेत तेथे बौध्द विहार, वॉल कंपाऊंड, पथदिवे, शौचालय युनिट, पर्यटकांसाठी बैठक व्यवस्था आदी कामासाठी मा.लोकप्रतिनिधी मिरज यांनी सामाजिक न्याय विभागाकडे मागणी केलेली आहे ,हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) तसेच सदर ठिकाणी निधी उपलब्ध करुन केव्हापर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

: (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी ऐतिहासीक व सांस्कृतिक महत्व असलेल्या ठिकाणाचा विकास करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने या योजनेच्या अटी व शर्ती निश्चित करण्याची कार्यवाही वित्त विभागाच्या सहमतीने शासनस्तरावर चालू आहे. सदर योजनेच्या अटी व शर्ती निश्चित झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**भोर (जि.पुणे) येथील पांगारी आश्रमशाळेमध्ये**
**निकृष्ट दर्जाचा होत असलेला अन्नधान्य पुरवठा**

**(३६) * ४४०३ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि. पुणे) तालुक्यातील पांगारी आश्रमशाळेतील विद्यार्थी निकृष्ठ दर्जाचे अन्न खात असल्यामुळे  तसेच अन्न-धान्य  च्या खोलीत उंदीर वावरत असल्याने विद्यार्थ्याचे आरोग्य धोक्यात आले असल्याची धक्कादायक बाब माहे सप्टेंबर, २०१४ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप , कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) दि.२५.९.२०१४  रोजी वर्तमानपत्रात पांगारी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय, तसेच अन्नधान्याच्या खोलीत उंदीर वावरत असल्याबाबत बातमी प्रसिध्द झाली होती.
(२), (३) व (४) सदर बातमीच्या  अनुषंगाने शिक्षण विस्तार अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडगाव यांनी दि.०५.१०.२०१४ रोजी भेट देऊन पाहणी केली. सदर भेटीत त्यांना बातमीमधील तपशीलात तथ्य नसल्याचे दिसून आले. वर्तमानपत्रातील बातमीत स्वंयपाकगृहाच्या मागील  बाजूस असलेला उंदीर अन्नधानाच्या कोठीगृहात आल्याचे दर्शविण्यात येऊन विपर्यास करण्यात आल्याचे दिसून आले.

-----------------

**वाशिम जिल्हयामध्ये निराधार, अपंग व श्रावणबाळ**
**या योजनांमध्ये लाभार्थ्यांना लाभ न मिळाल्याबाबत**

**(३७) * २५९८ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यामध्ये निराधार, अपंग व श्रावणबाळ या योजनांमध्ये मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना माहिन्याच्या पाहिल्या सप्ताहामध्ये लाभ देण्यात यावा असे शासनाचे आदेश असताना सुध्दा जिल्ह्यातील लोकांना अद्याप लाभ मिळाला नसल्याची तक्रार दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी राष्ट्रीय अपंग विकास महासंघ व इतरांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

: (१) होय, हे खरे आहे. राष्ट्रीय अपंग विकास महासंघ यांनी दि.१७/११/२०१४ रोजी जिल्हाधिकारी, वाशिम यांचेकडे अशा स्वरुपाची तक्रार केली आहे.

(२) व (३) वाशिम जिल्ह्यातील ६ तालुक्यांपैकी वाशिम तालुका वगळता अन्य ५ तालुक्यांमध्ये लाभार्थ्यांना नोव्हेंबर, २०१४ पर्यंत अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

वाशिम तालुक्यामध्ये संजय गांधी योजना समितीने दि.२२ एप्रिल, २०१३ रोजीच्या बैठकीत लाभ मंजूर केलेल्या लाभार्थ्यांना प्रत्यक्षात फेब्रुवारी, २०१४ मध्ये लाभ सुरु करण्यात आला, ही वस्तुस्थिती आहे. समितीने अर्ज मंजूर केल्यानंतर लाभार्थ्यांना खाते क्रमांक मे, २०१३ पर्यंत देण्याबाबत कळविण्यात आले होते. लाभार्थ्यांनी माहे ऑगस्ट, २०१३ पर्यंत खाते क्रमांक कळविले. तथापि, सदर खाते क्रमांक सात अकी होते. ऑनलाईन बँकिगसाठी दहा अकी खाते क्रमांक आवश्यक होते. दरम्यानच्या काळात जून, २०१३ ते सप्टेंबर, २०१३ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. अतिवृष्टी मुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी व आपदग्रस्तांना मदत करण्यासाठी अधिकारी/कर्मचारी व्यस्त होते. लाभार्थ्यांकडून योग्य खाते क्रमांक प्राप्त करणे व अतिवृष्टीच्या कामामुळे अनुदान वाटपास विलंब झाला आहे.

संजय गांधी योजना समितीने दि. १८/१/२०१४ व ३/२/२०१४ रोजीच्या बैठकीत मंजूर केलेल्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेच्या ५३९ लाभार्थ्यांचे अनुदान जुलै, २०१४ मध्ये सुरु करण्यात आले. मात्र, समितीने मंजूर केलेल्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या २११ लाभार्थ्यांची यादी तयार होण्यास विलंब झाला. माहे फेब्रुवारी, २०१४ व मार्च, २०१४ मध्ये वाशिम तालुक्यात मोठ्या प्रमाणात गारपिट झाली. गारपिटग्रस्तांच्या सर्वेक्षणामध्ये कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. या कारणास्तव संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या २११ लाभार्थ्यांच्या लाभ वाटपास विलंब झाला आहे.

त्याचप्रमाणे वाशिम तालुक्यातील संजय गांधी योजना कार्यालयातील श्री.व्हि.एन.निजामपुरे, अव्वल कारकून यांचा दि. २७ जुलै, २०१४ रोजी हृदयविकाराने मृत्यू झाला. श्री.व्हि.एस. कांबळे, कनिष्ठ लिपीक लाचलुचपत विभागाच्या कारवाईमुळे दि. ०९ जुलै, २०१४ रोजी निलंबीत झाले. श्री.एस.ए.तांदळे नायब तहसिलदार दि. ३१ जुलै, २०१४ रोजी सेवानिवृत्त झाले. याव्यतिरिक्त श्री.पी.एस.अघम, कनिष्ठ लिपीक यांनी या कामात निष्काळजीपणा केल्याचे आढळून आले. त्यांची कार्यालयात वारंवार गैरहजेरी, कामात लक्ष नसणे, असे वर्तन आढळून आले. त्यांची दि. २३ जून, २०१४ रोजी पदोन्नती होवून स्थानांतरण झाले. मात्र त्यांनी दि. ०४ सप्टेंबर २०१४ रोजी संगणकातील सर्व डेटा डिलीट केल्याचे लक्षात आले. यामुळे देयके अदा न झाल्यामुळे त्यांना दि. १२ डिसेंबर, २०१४ रोजी निलंबीत करण्यात आले.

वरील कारणांमुळे व संजय गांधी योजना शाखेत सर्वच कर्मचारी नवीन असल्यामुळे अनुदान वाटपास विलंब झाला आहे. सदर २११ लाभार्थ्यांना अनुदान वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**खामगांव ते शेगांव (जि.बुलढाणा) हा रस्ता चौपदरीकरण करणेबाबत**

**(३८) * ९३३ श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव ते शेगांव या रस्त्यावरून श्री.संत गजानन महाराज शेगांव यांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढत असून सदरहू रस्ता छोटा असल्यामुळे या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, खामगांव एस.टी.डेपो जवळ स्व.भटकर व त्यांची मुलगी कु.नेहा यांचा भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने जबर धडक दिल्यामुळे दोघेही जागीच ठार झाल्याची घटना दिनांक २५ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू रस्त्यावरील अपघात थांबविण्यासाठी व खामगांव ते शेगांव हा रस्ता चौपदीरकरण करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) शेगांव येथे दर्शनासाठी येणा-या भाविकांची गर्दी वाढली आहे. मात्र खामगांव ते शेगांव या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले असल्याचे दिसून येत नाही.
(२) होय.
(३) पोलीस विभागाकडून सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून सदर अपघात वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्यंची नोंद पोलीस दप्तरी आहे.
खामगांव ते शेगांव हा रा.मा. क्र.२४ चा भाग असून या भागातील रस्त्याची लांबी १७.६० कि.मी. आहे. त्यापैकी शेगांव गावाजवळील ४.२० कि.मी. लांबीतील रस्त्यंचे चौपदरीकरण करण्यात आले आहे. उर्वरित लांबीतील चौपदीकरणाचे काम आवश्यकतेनुसार मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामीण भागातील आश्रमशाळेतील**
**विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(३९) * १६४७ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील आश्रमशाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे सबंधित कर्मचा-यांच्या दुर्लक्षपणामुळे गत दहा वर्षात ७९३ विद्यार्थी मृत्यूमुखी पडल्याची गंभीर माहिती माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच विद्यार्थ्यांना योग्य वेळी उपचार उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (1) हे अशंत: खरे आहे.

राज्यातील आश्रमशाळांमध्ये सन 2001-02 ते सन 2011-12 या दहा वर्षात एकूण 793 विद्यार्थी विविध कारणांमुळे मृत्युमुखी पडल्याची माहिती श्री.रविंद्र तळपे यांनी मा. उच्च न्यायाल, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. 69/2013 च्या अनुषंगाने मा.न्यायालयात सादर केली आहे.

(2) व (3) मा.उच्च न्यायालयाने उपरोक्त नमूद जनहित याचिकेच्या अनुषंगाने दि.18/06/2014 रोजी सर्व आश्रमशाळांची तपासणी करण्याच्या व ज्या आश्रमशाळांमध्ये मुलांना मुलभूत सुविधा देण्यात येत नाहीत त्यांचे अनुदान बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत.

मा.न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची तापसणी ऑगस्ट, 2014 मध्ये करण्यात आलेली आहे. सर्व तापसणी अहवाल एकत्रित करुन त्यांचे विश्लेषण करण्यासाठी टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स, चेंबुर यांचेकडे सोपविण्यात आलेले असून त्यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

**मुंबई-नाशिक महामार्गावरील कसारा घाटात**
**नवीन रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४०) * २७६ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई - नाशिक महामार्गावरील कसारा घाटात नवीन रस्ता खचून तडा गेला असल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, 2014 च्यासुमारास निदर्शनास आला हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर रस्ता खचल्याने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसून आल्याने सदर रस्त्यांच्या कामाची सखोल चौकशी करण्यात आली काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर रस्त्याचे काम करणा-या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच कारवाई होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (1) होय.

(2) कसारा घाटात नव्याने बांधण्यात आलेल्या रस्त्याच्या व जुन्या रस्त्याच्या काही भागामध्ये जुलै, 2014 मध्ये झालेल्या अतिवृष्टीने रस्त्याच्या भरावामध्ये पाणी पाझरुन रस्ता काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाल्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(3) रस्त्याची हानी ती निकृष्ट दर्जाच्या कामामुळे झाली नसून काही भागात पावसाचे पाणी रस्त्याच्या भरावातून पाझरल्याने झाली असल्याने ठेकेदारावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील वर्सोवे-घोडबंदर या मार्गावर वर्सोवे येथे असलेला टोल वसुली नाका**

**(४१) * ३१८६ श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील वर्सोवे-घोडबंदर या मार्गावर वर्सोवे येथे टोल वसुलीनाका बसविण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टोल वसुली नाका मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर हद्दीतील तसेच टोलनाक्याच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना आपल्याच हद्दीत येण्या-जाण्याकरीता टोल भरावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नागरिकांना टोल भरावा लागणार नाही याकरीता शासनाकडे विशेष धोरण अथवा उपाययोजना केल्या आहेत काय,
(५) नसल्यास, का नाही, त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) शासनाच्या पथकर अधिसूचनेप्रमाणे नागरिकांच्या सोईसाठी, हलक्या मोटार वाहनासाठी मासिक पास व सर्व प्रकारच्या वाहनांसाठी ५० कुपन्स घेतल्यास २५ टक्के सूट व १०० कूपन्स घेतल्यास ५० टक्के सूट अशा सवलती देण्यात आल्या आहेत.

-----------------

**वाहेगाव ते मुसलमान वाडी (ता. जि. नांदेड) या रस्त्याच्या डांबरीकरणाचे व मजबुतीकरणांच्या कामांबाबत**

**(४२) * २३९० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) वाहेगाव ते मुसलमान वाडी (ता. जि. नांदेड) या रस्त्याचे डांबरीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम लवकरात लवकर होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन रस्त्यांच्या लांबीत काम प्रगतीत आहे. रस्ता प्रजिमा २८ चा भाग आहे. या भागातील रस्त्याची लांबी ९ किमी आहे. यापैकी १.८ किमी लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम नाबार्ड योजने अतंर्गत प्रगतीत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम करण्यात येईल. उर्वरित लांबीतील रस्ता सुस्थितीत असून रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

-----------------

**अकोला व वाशिम विभागातील डांबरी रस्त्याच्या सुधारणा, दुरुस्ती, नुतनीकरणाच्या कामात ऑईल मिश्रीत तसेच भेसळयुक्त डांबराचा वापर करण्यात आला असल्याबाबत**

**(४३) * ४२८० श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) सार्वजनिक बांधकाम मंडळ अकोला अतंर्गतच्या अकोला व वाशिम विभागातील डांबरी रस्त्याच्या सुधारणा, दुरुस्ती, नुतनीकरणाच्या कामात ऑईल मिश्रीत तसेच भेसळयुक्त डांबराचा वापर करण्यात आला असल्याचे दिनांक ११ मे, २०१३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, भेसळयुक्त डांबराच्या कामामुळे काम केलेल्या रस्त्यांची अवस्था एक वर्षाचे आत अत्यंत वाईट झाली आहे, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर कामाचे रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे अनेक अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमावावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) अकोला व वाशिम जिल्हयातील डांबरी रस्त्याच्या सुधारणा, दुरुस्ती, नुतणीकरणाच्या कामात गुणवत्तेचेच डांबर वापरले असून सदयस्थितीत सदरील कामे सुस्थीतीत आहेत.
(३) सुधारणा, दुरुस्ती नुतणीकरणाची कामे केलेल्या रस्त्यावर अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयात कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनला योग्य भाव मिळल नसल्याबाबत**

**(४४) * ४२९९ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनची आवक सिमित असतानाही भाव मात्र अल्प मिळत असल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतमाल तारण कर्ज योजना बंद झाल्याने मिळेल त्या भावात शेतकऱ्यांना शेतमाल विकावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन काय कार्यवाही वा उपाययोजना करणार आहे, तसेच मार्केटीग फेडरेशनची शेतमाल तारणकर्ज योजना परत सुरू करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे, तसेच यावर्षीचा खरीप हंगाम शेतक-यांना अखेरपर्यंत मारक ठरला असल्यामुळे त्यांना आर्थिक नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातर्फे शेतमाल तारण कर्ज योजना बंद करण्यात आली आहे. तथापि, सदर योजना बाजार समितीच्या स्वनिधीवर सुरु आहे. तसेच, सद्यस्थितीत बाजार समितीमध्ये आधारभूत किंमती पेक्षा जास्त दराने सोयाबीनची खरेदी सुरु आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळातर्फे वखार पावतीवर तारण योजना प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्हा अग्रणी बँक, विदर्भ कोकण ग्रामिण विकास बँक यांना सहकारी कर्जाचे रुपांतर, तसेच शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगीती इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. खरिप हंगाम २०१४ मध्ये अपुऱ्या पावसामुळे २२ जिल्ह्यांतील १९५९ गावात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी घोषीत करण्यात आली आहे. यासंदर्भात बाधीत क्षेत्रात मदत देण्याकरिता रु.३९२४.५९ कोटी रक्कमेचे ज्ञापन महसूल विभागामार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहे.

-----------------

### जालना सार्वजनिक बांधकाम क्र.1 येथील अभियंत्यांच्या गैरकारभाराबाबत

**(४५) * ३१३० श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1)जालना येथील सार्वजनिक बांधकाम क्र.1 मधील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी 3054 या लेखा शिर्षासाठी सन 2013-14 व 14-15 या आर्थिक वर्षात सर्व नियम मोडत कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार करण्यात आली, हे खरे आहे काय,
(2) तत्कालीन कार्यकारी अभियंता जी.एच.राजपूर यांनी उपअभियंता व अभियंत्यांना हाताशी धरुन ठराविक मजूर सह. संस्था व ठेकेदारांना हाताशी धरुन गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्तप्रकरणी चौकशी झाली आहे काय, त्यात काय आढळले, दोषी विरुध्द काय कार्यवाही झाली वा करण्यात येत आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) व (३) या संदर्भात चौकशीसाठी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे. समितीमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

### मिरज तालुक्यातील (जि.सांगली) मिरज टाकळी-एरंडोली-शिपुर-बेळंकी या रस्ताच्या रुंदीकरण व मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत

**(४६) * ४४६० श्री.धनंजय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील मिरज टाकळी-एरंडोली-शिपुर-बेळंकी- रस्ता प्रजिमा 45 चे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत केंद्रीय मार्ग निधी अतंर्गत घेण्याबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दि.22/10/2014 रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी मिरज यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू मागणीनुसार केंद्रीय मार्ग निधी अतंर्गत कामे समाविष्ट करण्यात येऊन सदरहू कामांना सुरुवात करण्यात आली आहे काय,

(3) अद्यापपर्यंत कामांना सुरुवात करण्यात आली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय,
(4) तसेच हा रस्ता पुर्ण केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
(२), (३) व (४) सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यातील मिरज टाकळी एरंडोली शिपूर बेळंकी रस्ता हा रस्ते विकास योजना २००१-२०२१ नूसार रा.मा.क्र.१५३ असा दर्जोन्नत झालेला आहे. या रस्त्याच्या एकूण लांबीपैकी ३२ कि.मी. इतकी लांबी मिरज तालुक्यातील आहे. सदर ३२ कि.मी. लांबीपैकी मिरज तालुक्यातील कोळे घाट नांद्रे कवठेमहाकाळ सलगरे रस्ता रा.मा.क्र.१५३, कि.मी.१४७/००० ते १५९/०००, भाग बेळंकी ते मल्लेवाडी या १२ कि.मी. लांबीतील रस्त्याच्या सुधारणेसाठीचा प्रस्ताव केंद्रीय मार्ग निधी अतंर्गत, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ च्या शासन पत्रान्वये केंद्रशासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्यास अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही. प्रस्तुत रस्ता व उर्वरित लांबीतील रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

**आपटी भावेखल (ता. भोर, जि. पुणे) येथे निरा नदीवर पूल बांधणेबाबत**

**(४७) * ४४१५ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) आपटी भावेखल (ता. भोर, जि. पुणे) येथे निरा नदीवर मोठा पूल बांधण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय,
(२) व (३) प्रश्नाधीन पुलाचे काम नाबार्ड-२० अतंर्गत प्रस्तावित असून मंजुरी, निकष व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

-----------------

**देवगाव (ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक) येथील शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळेच्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(४८) * ३३९९ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) देवगाव (ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक) येथील शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळेचे नुतन इमारतीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचे तसेच सदर काम बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू आश्रमशाळेचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (1) हे खरे नाही.
सद्य:स्थितीत सदरचे काम हे प्राथमिक स्टेजवर असुन पाया फुटीगचे काम प्रगतीत आहे. सदर कामाकरिता वापरण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता (स्टील, सिमेट, वाळु इत्यादी) दक्षता व गुणनियंत्रण मंडळ (सार्वजनिक बांधकाम विभाग) जिल्हा प्रयोगशाळा, नाशिक यांनी तपासणी केलेली असून साहित्याचा दर्जा चांगला आहे.
(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**किनगाव ते पानगाव (ता. रेणापूर, जि. लातूर) या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाच्या कामाबाबत**

**(४९) * २३९१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) किनगाव ते पानगाव (ता. रेणापूर, जि. लातूर) या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम गेल्या २ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम लवकरात लवकर होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
प्रत्यक्षात किनगाव ते पानगाव ही दोन्ही गावे जोडणारा रस्ता अस्तित्वात नाही.
(२) किनगाव वरुन पानगावाला जाण्यासाठी दोन पर्यायी मार्ग उपलब्ध असून सदर रस्तांवरील कामे निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत दोन्ही मार्गावरील लांबीतील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्याचे काम प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे पांचाळा (ता.जि.वाशिम) येथील गट क्र. 180, 108, 199 मधील 8.08 हेक्टर जमीन खाजगीत विक्री केल्याबाबत**

**(५०) * ४२९२ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) वाशिम जिल्ह्यातील अनंत सहकारी सुतगिरणी मर्या.वाशिम यांनी अकोला-नांदेड राज्यमार्गाला लागून असलेली मौजे पांचाळा ता.वाशिम येथील गट क्र. 180, 108, 199 मधील 8.08 हेक्टर जमीन खाजगीत विक्री केली आहे, हे खेर आहे काय,
(2) असल्यास, सदर विक्री केलेल्या जमीनीच्या महसुलावर व सुतगिरणीच्या बांधकामांवर शासनाकडे कर भरलेला नाही, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर जमीनीचे मुल्यांकन न काढता जमीनीची किमंत नाममात्र 2.96 लाक्ष दाखविण्यात आली, हे खरे आहे काय तसेच सदर जमीन नियमानुसार विक्री केली नाही, हेही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
गिरणीने ८.०८ हेक्टर जमीन गट नंबर १८७, १९८, १९९ मधील जमीन जाहिर निविदा काढून विक्री केली आहे.
(२) नाही.
गिरणीने जमीनीच्या महसूलावर दिनांक २४/१२/२०११ रोजी कर भरला आहे. तसेच बांधकाम कराची संबंधीताकडून मागणी नसल्यामुळे बांधकाम कर भरला नाही.
(३) नाही.
गिरणीने गट नंबर १८७, १९८, १९९ मधील ८.०८ हेक्टर जमीन विक्री करतांना जमीनीचे मुल्यांकन सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग-२ वाशिम यांचेकडून दिनांक १२/११/२०१० रोजी करुन घेतलेले आहे. तसेच सदर जमीन नियमानुसार शासन मान्यतेने तसेच जाहिर निविदा काढून विक्री केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव मिळणेबाबत**

**(५१) * ४३२२ अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर पिकाला योग्य भाव तर काही शेतकऱ्यांचे पुरेसे पीक न झाल्याने आत्महत्येची वेळ आली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन चौकशी करून आवश्यक त्या उपाययोजना करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. खरिप हगाम २०१४ मध्ये अपुऱ्या पावसामुळे राज्यातील २२ जिल्ह्यातील १९०५९ गावात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी घोषित करण्यात आली आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, अमरावती जिल्ह्यात शेतमालाची खरेदी ही आधारभूत किंमतीपेक्षा जास्त दराने सुरु आहे.
(२) व (३) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्हा अग्रणी बँक, विदर्भ कोकण ग्रामिण विकास बँक यांना सहकारी कर्जाचे रुपांतर, तसेच शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगीती इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. खरिप हंगाम २०१४ मध्ये अपुऱ्या पावसामुळे बाधीत`क्षत्रात मदत देण्याकरिता रु. ३९२४.५९ कोटी रक्कमेचे ज्ञापन महसूल विभागामार्फत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहे.

-----------------

**सांगली जिल्ह्यातील मिरज-कृष्णाघाट रस्त्यावर रेल्वे उड्डाणपूल बांधण्याबाबत**

**(५२) * ४४७० श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मिरज-कृष्णाघाट (जि.सांगली) रस्त्यावर रेल्वे मार्गावर उड्डाणपूल बांधण्यात यावा या मागणीसाठी नागरिकांनी दिनांक २८ जानेवारी, २०१४ रोजी वा त्या सुमारास कृष्णाघाट रस्त्यावर रेल्वे गेट जवळ निदर्शने केली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून या ठिकाणी उड्डाणपुल बांधण्याच्या मागणीसाठी पाठपुरावा करण्यात आला होता, परंतु राज्य शासन व रेल्वेने या मागणीची दखल घेतलेली नाही हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदरहू रेल्वेमार्गावर उड्डाणपूल बांधण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे
(4) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर ठिकाणी उड्डाण पूल बांधण्याचे काम रेल्वे व राज्य शासनाच्या समाईक सहभागातून बांधण्याचा प्रस्ताव आहे. प्रस्ताव रेल्वे विभागाकडे सादर करण्यात आला आहे. पुलाचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.